ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT.
Reg. No. P. 324. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २४ जुलै, १९५७ | अंक ३०

## विविध माहिती

**डॉक्टर्सना प्रलोभन**—भारताच्या ग्रामीण भागांत वैद्यकीय मदतीची फार गरज असूनसुद्धां ह्या ना त्या कारणांमुळें डॉक्टर्स खेडेगांवांत जाऊन व्यवसाय करण्यास तयार नसतात. डॉक्टर्सना खेडेगांवीं जाण्यास आकर्षण वाटावें म्हणून त्यांना चांगला पगार देण्याचा विचार मध्यप्रदेश सरकार करीत आहे.

**आसाममधील नवें विद्युत्केंद्र**—गौहत्तीपासून १७ मैलांवर बांधण्यांत आलेल्या विद्युत्केंद्राचें उद्घाटन करण्यांत आलें. धरण बांधण्याच्या कामीं कानडाकडून कोलंबो योजनेप्रमाणें मदत देण्यांत आली होती. केंद्रासाठीं २ कोटी रुपये खर्च आला आहे. त्यावर ८,४०० किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल.

**रबराच्या मळ्यावरील कामगार**—मलबारमधील रबराच्या मळ्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनाबद्दल वाद उत्पन्न झाला होता. मळ्याचे मालक व कामगारांचे प्रतिनिधी ह्यांची बैठक भरवून राज्य सरकारच्या मजूरमंत्र्यांनीं तो निकालांत काढला आहे. आतां कामगारांना रोजीं १ रु. ७ आण्याऐवजीं १ रु. ११ आ. ६ पै मिळणार आहेत.

**कवींना बक्षिसें**—१९५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची शताब्दी व स्वातंत्र्याची पहिली दशाब्दी ह्यांच्या निमित्तानें ओरिसाच्या सरकारनें ह्या विषयावरील उत्कृष्ट कवितांना तीन बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे. पहिलें बक्षीस २५० रुपयांचें, दुसरें १५० रु. चें व तिसरें १०० रु. चें आहे.

**पाकिस्तानला हेलिकॉप्टर्सची देणगी**—पूर्व पाकिस्तानांत वारंवार होणाऱ्या पुरांत लोकांना मदत करतां यावी म्हणून पाकिस्ताननें अमेरिकेकडे कांहीं हेलिकॉप्टर्सची मागणी केली होती. पाकिस्तानच्या विनंतीस मान देऊन अमेरिकेनें अशा प्रकारचीं दोन विमानें देऊ केलीं आहेत.

**सुरत शहरांतील रेशमाच्या गिरण्या**—सुरत शहरांतील रेशमाच्या बारा गिरण्यांच्या चालकांनीं, एक महिन्यानंतर गिरणींतील एक पाळी बंद करण्यांत येणार आहे, अशा नोटिसा लावल्या आहेत. बाजारांत मंदी असल्याचें कारण देण्यांत आलें आहे. तिसरी पाळी बंद झाल्यास ३०० कामगार बेकार होतील.

**टाटा कंपनीची कर्जाची मागणी**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें भारत सरकारमार्फत जागतिक बँक व अमेरिकन बँक ह्यांच्याकडे जमशेटपूर येथील आपल्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठीं १६ ते १७ कोटी रुपयांचें कर्ज मागण्याचें ठरविलें आहे. ह्याबाबत प्राथमिक वाटाघाटी नुकत्याच करण्यांत आल्या.

**आंध्रमधील साखरेचे कारखाने**— आंध्र राज्यांत चार साखरेचे कारखाने उभारण्याचें काम चालू आहे. ह्या कारखान्यांतून साखर तयार होऊं लागली कीं राज्यांतील साखरेचें उत्पादन ८०,००० टनांनीं वाढेल. सध्यां राज्यांत ९ साखर कारखाने प्रत्यक्ष उत्पादन करीत आहेत. आणखी ४ सहकारी साखर कारखान्यांना परवाने देण्यांत आले आहेत.

**विद्यार्थ्यांना फी माफ**—१९५७–५८ चें शालेय वर्ष सुरू झाल्यावर ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचें वार्षिक उत्पन्न १,२०० रुपयांपेक्षा कमी असेल अशांच्या मुलांना ९ व्या इयत्तेच्या फींची माफी देण्याचें केरळच्या सरकारनें ठरविलें आहे. मात्र शाळांतून खास म्हणून ज्या फी घेण्यांत येतील, त्या त्यांना याव्या लागणार आहेत.

**अल्युमिनमच्या उत्पादनांत वाढ**—भारतामधील अल्युमिनमच्या उत्पादनांत वाढ झाली आहे. १९५५ सालीं ७२२५ टन उत्पादन झालें होतें. १९५६ च्या पहिल्या सहामाहीचें उत्पादन ३,४४९ टन झालें. १९५८ अखेर देशांतील अल्युमिनमचा खप ३५,००० टनांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. १९५५ सालीं २२,७६५ टन अल्युमिनम खपलें.

**माकडांच्या निर्यातीस विरोध**—वैद्यकीय संशोधनासाठीं प्राण्यांची चीरफाड करणें अगर त्यांना कृत्रिम रीतीनें रोगी करणें ह्या प्रथेला विरोध करणारी एक संस्था हॉलंडमध्यें आहे. भारतामधून ह्या कारणासाठीं माकडे निर्यात करण्यास बंदी करावी अशी मागणी संस्थेनें पं. नेहरू ह्यांच्याकडे केली आहे. गेल्या वर्षीं भारतानें १,५७,००० माकडांची निर्यात केली.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**चित्रपट दिग्दर्शकाचें वास्तव्य**—सुप्रसिद्ध इटालियन चित्रपट दिग्दर्शक रॉबर्टो रोझेलिनी सध्यां भारतांत वास्तव्य करून आहेत. भारताच्या कलात्मक, आर्थिक व इतर जीवनाविषयीं भारत सरकारच्या सांगण्यावरून ते १२ अनुबोधपट तयार करणार आहेत. त्याशिवाय एक संपूर्ण बोलपटहि ते निर्माण करतील.

**आमदारांसाठीं माहिती**—मद्रास सरकारच्या कायदेमंडळ खात्यानें दोन्ही सभागृहाच्या आमदारांना माहिती पुरविणारी एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. पुस्तिकेंत कायदेमंडळाच्या कामकाजाच्या पद्धतीविषयीं तामिळ भाषेंत माहिती दिली आहे. ज्या तामिळ शब्दांना इंग्रजी प्रतिशब्द देणें शक्य होतें त्यांना तो दिला आहे.

**पार्लमेंटच्या सभासदांचे पगार**—ब्रिटनच्या पार्लमेंटच्या सभासदांचा पगार दरसाल १,००० पौंड होता, तो आतां १,७५० पौंड करण्यांत आला आहे. पगाराशिवाय त्यांना हजेरी-भत्ता म्हणून दरसाल २८० पौंड मिळत असत. मंत्री व त्यांचे चिटणीस ह्यांच्याहि पगारांत वाढ करण्यांत आली आहे. सर्वांना वाढलेल्या रकमेवर प्राप्तीवरील कर द्यावा लागेल.

**जपानमध्यें नव्या प्रकारची साथ**—जपानच्या पश्चिमेकडील भागांत एका नव्या प्रकारच्या इन्फ्ल्युएंझाची सांथ पसरत असल्याचें आढळून आलें आहे. शाळांतील मुलें प्रमाणाबाहेर आजारी पडूं लागल्यानें ह्या तापसरीकडे वैद्यकीय संशोधकांचें लक्ष गेलें. नवी सांथ जुन्याचीच पण जरा वेगळी आवृत्ति आहे असें म्हणतात.

**पश्चिम आशिआंत टोळधाडीचा इषारा**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेनें पश्चिम आशिआंतील राष्ट्रांना असा इषारा दिला आहे कीं, गेल्या २५ वर्षांत कधींहि आली नव्हती एवढी प्रचंड टोळधाड ह्या भागावर येणार आहे. पूर्व-पाकिस्तानपासून लिबिआपर्यंत पसरलेल्या प्रदेशांतील २२ राष्ट्रांना ह्या संकटाला तोंड द्यावें लागणार आहे.

**फ्रेंच कंपनींची साह्याची तयारी**—आसामच्या सरकारनें सार्वजनिक मालकीच्या विभागांत जो तेलाचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे, त्याला तांत्रिक साह्य देण्याची तयारी कांहीं फ्रेंच कंपन्यांनीं दाखविली आहे. कारखाना गोहत्ती येथें काढण्यांत येणार आहे. त्याचा तपशील राज्य सरकार लवकरच भारत सरकारकडे पाठविणार आहे.

**समाजहित योजनांवरील खर्च**—मुंबई राज्यांत दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत स्त्रिया व मुलें ह्यांच्या हिताच्या योजनांवर ५० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सध्यां अशा प्रकारच्या ६३ योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. योजनांना सुशिक्षित स्त्रियांकडून चांगला पाठिंबा मिळत आहे.

**केरळमधील दरडोई उत्पन्न**—केरळ सरकारच्या आकडेविषयक खात्यानें असा हिशेब केला आहे कीं, राज्यांतील नागरिकांचें दरडोई वार्षिक उत्पन्न २१९ रुपये आहे. केरळ राज्याचें उत्पन्न ३१९·४ कोटी रुपये आहे. भारताचें वार्षिक उत्पन्न ९,६५० कोटी रुपये आहे. केरळची लोकसंख्या १·४६ कोटी आहे.

**काटकसरीची एक तऱ्हा**—रेवा शेतकी खात्यानें आपल्या कचेरींत काटकसरीची मोहीम सुरू केली आहे. खात्यांत काम करणाऱ्या कारकुनांना पुरविण्यांत आलेल्या खुर्च्या व टेबलें काढून घेण्यांत आलीं आहेत. आतां सर्व कारकून बसून कामें करतात. टेबलें व खुर्च्या ग्वाल्हेरला रवाना करण्यांत आलीं.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी


लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार






# अर्थ

बुधवार, ता. २४ जुलै, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशीय चलनाच्या अडचणींतून मार्ग

भारताला सध्या परदेशीय चलनाच्या तुटवडयाला तोंड द्यावें लागत आहे. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठीं व्यापारी देण्याघेण्यासंबंधी भारत व पूर्व-जर्मनी ह्यांच्यामध्यें एक करार करण्यांत आला आहे. करारांतील अटीप्रमाणें, भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री, औद्योगिक कच्चा माल आणि रासायनिक पदार्थ पूर्व-जर्मनीकडून घेतल्यास त्यांची किंमत रुपयाच्या चलनांत देण्यांत येणार आहे. पूर्व-जर्मनीशीं होणारा निर्यात व आयात व्यापार कॉर्पोरेशनमार्फतच करण्यांत येणार आहे. पूर्व-जर्मनीची सरकारी बँक भारताच्या स्टेट बँकेंत एक खास खातें उघडणार आहे. जर्मनीकडून जी आयात केली जाईल, त्या मालाची किंमत ह्या खात्यांत जमा करण्यांत येणार आहे. ह्या रकमेचा उपयोग करून पूर्व-जर्मनी आपणांस हवा असलेला माल भारताकडून विकत घेईल. व्यापारी देण्याघेण्याच्या ह्या पद्धतीमुळें परदेशीय चलनाचा प्रश्न उपस्थित होणार नाहीं. त्याशिवाय, किंमत उशिरा देण्याचें टाळतां येऊन निर्यातीची वृद्धीहि करतां येईल. पूर्व-जर्मनीकडून भारताला गिरण्यांना लागणारे स्वयंचलित माग, कच्ची फिल्म, कॉस्टिक सोडा व सोडा ॲश हा माल मिळूं शकेल. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें स्वयंचलित माग विकत घेण्याचा एक मोठा करार केलाहि आहे. उलटपक्षीं, भारत पूर्व-जर्मनीला तागाचा माल, चहा, कॉफी, हातमागाचें कापड, शिवण्याचीं यंत्रें, विजेचे पंखे, इत्यादि माल पुरवूं शकेल. अशा प्रकारचा रोज खपाचा माल जर्मनी भारताकडून घेणारहि आहे.

## उद्योगपतींचा परदेशांतील दौरा

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संस्थेतर्फे भारतामधील १४ उद्योगपतींचें एक सदिच्छा मंडळ येत्या सप्टेंबर महिन्यांत परदेशांच्या दौऱ्यावर जाणार आहे. भारतामधील औद्योगिक मालाला परदेशांत बाजारपेठ लाभणें कितपत शक्य आहे तें अजमावण्याचा व उशिरा किंमत देण्याच्या अटीवर भांडवली माल भारताला मिळूं शकेल काय ह्यासंबंधी खाजगी भांडवलदारांबरोबर वाटाघाटी करण्याचा मंडळाचा बेत आहे. मंडळ अमेरिका व कॅनडा ह्या देशांत एक महिनाभर फिरणार आहे. त्यानंतर ब्रिटनचा १० दिवसांचा दौरा करून तें आठ दिवसांसाठी पश्चिम जर्मनीला भेट देईल व अखेर तीन दिवस फ्रान्समध्यें घालवून परत येईल. डॉलरच्या कक्षेंत असलेल्या देशांत भारताच्या मालाच्या खपाची शक्यता अजमावणें आणि भांडवली मालाची आयात करणें हे दोन प्रमुख हेतू मंडळापुढें आहेत. भारतामधील बहुतेक प्रमुख उद्योग-धंद्यांच्या प्रतिनिधींचा समावेश मंडळांत करण्यांत आला आहे. भारतामधील भांडवलदारांशी करार करून संयुक्तरीत्या नवीन कारखाने काढण्यासाठीं अमेरिकन भांडवलदारांशी बोलणीं करण्याचाहि मंडळाचा बेत आहे. कापड, एंजिनिअरिंग, रेऑन, इत्यादि धंद्यांविषयी संयुक्त मालकीचे कारखाने काढण्यासाठीं तेथल्या तेथें दौऱ्यांतच वाटाघाटी करण्याची तयारीहि मंडळीं-तील कांहीं प्रतिनिधींनीं केली आहे. अमेरिकेंतील व्यापारी संस्थांना व भांडवलदारांना भारतामधील करपद्धतीची माहिती करून देण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें, परदेशीय भांडवल-दारांना भारतांत देण्यांत येणाऱ्या सवलतींची कल्पनाहि त्यांना करून देण्यांत येईल.

## ब्रिटनमधील चलनवृद्धीचा धोका

ब्रिटनमध्यें चलनवृद्धीचा धोका डोकें वर काढूं लागला आहे, आणि ब्रिटिश पौंडाची किंमत कमी होईल किंवा काय अशी भीति वाटूं लागली आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं राजकीय पुढारी, कारखानदारांचे प्रतिनिधी आणि कामगारांचे प्रतिनिधी ह्यांची संयुक्त बैठक लवकरच भरविण्यांत येणार आहे. ब्रिटनचे चॅन्सलर ऑफ दि एक्सचेकर, मि. थॉर्निक्रॉफ्ट ह्यांनीं आर्थिक परिस्थितीचें जें निदान केलें आहे तें बरेंच चिंताजनक आहे असें म्हणतात. ब्रिटनच्या सरकारकडून स्थानिक सरकारी संस्था जें कर्ज घेतात त्यावरील व्याजाचा दर ६ टक्के करण्यांत आला आहे. ह्या धोरणामागें सरकारतर्फे होणारा पैशाचा बटवडा कमी करण्याचाच हेतु होता. तथापि एवढें करूनच परिस्थितीला आळा घालतां येण्यासारखें नाहीं, ह्याची जाणीव त्यांना आहे. राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेल्या धंद्यावर अलीकडे विशेष टीका होऊं लागली आहे. गेले कित्येक महिने त्यांनीं आपल्या नोकरांचे पगार वाढविण्याचें व नंतर आपल्या उत्पादनाच्या किंमतीहि वाढविण्याचें धोरण अवलंबिलेलें होतें. वेतन व पगारवाढीच्या मागण्या ह्या धंद्यापासून खाजगी मालकीच्या धंद्यांपर्यंत पोचल्याशिवाय रहात नाहींत. त्यामुळें वेतन व किंमती ह्यांचा पाठशिवणीचा खेळ सुरू होतो. पण, उत्पादनांत मात्र प्रमाणबद्ध वाढ होत नाहीं. मि. थॉर्निक्रॉफ्ट ह्यांच्या माहितीप्रमाणें गेल्या वर्षी ब्रिटनमध्यें वाढलेल्या वेतनासाठीं व पगारासाठीं ९० कोटी कोटी पौंड खर्च करण्यांत आले. बटवडा झालेल्या पैशानें विकत घ्यावयाच्या वस्तूंच्या उत्पादनांत मात्र वाढ झाली नाहीं.

## साखरेच्या तारणावरील कर्जें

साखरेच्या तारणावरील कर्जें आखडती घेण्याचा सल्ला रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना दिला आहे. जानेवारीच्या प्रारंभीं ह्या कर्जाची रक्कम १३·६५ कोटी रु. होती, ती पुढें वाढत कसकशी गेली, हें खालील आकडे दर्शवितील :—

| १९५७ | कोटी रु. |
|---|---|
| ११ जानेवारी | ३१·६५ |
| २५ जानेवारी | ३५·३९ |
| ८ फेब्रुवारी | ४०·४६ |
| २२ फेब्रुवारी | ५४·३९ |
| १५ मार्च | ४८·५२ |
| २९ मार्च | ५४·१९ |
| १२ एप्रिल | ५४·७४ |

## महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखाने

### अडचणी दूर होत आहेत

आयातीवरील नव्या बंधनांमुळें सहकारी साखर कारखान्यांवर गंडांतर आलें आहे, अशी कित्येकांची समजूत झाली आहे. जर्मन तज्ज्ञ कारखान्यांची उभारणी अर्धवट टाकून स्वदेशीं परत गेले, कारखाने वेळेवर सुरू न झाल्यामुळें नेमलेले लोक काढून टाकण्यांत येऊन ते बेकार झाले, इत्यादि बातम्यांनीं गोंधळांत भरच टाकली आहे.

ह्यासंबंधांत वस्तुस्थिति अशी आहे, कीं लोणी येथील आद्य सहकारी कारखाना मागेंच सुरू झाला असून कोपरगांव कारखान्यांत गेल्या हंगामांत साखर निघूं लागली आहे.

बाकीच्या सहकारी कारखान्यांचे दोन गट पडतात. पहिल्या गटांत, ज्यांच्या यंत्रसामुग्रीची ऑर्डर योग्य वेळीं जाऊनहि यंत्रसामुग्री उभारली गेली नाहीं व त्यामुळें गेल्या हंगामांत अपेक्षेप्रमाणें साखर होऊं शकली नाहीं, त्यांचा समावेश होतो. माळेगांव, राहुरी, राहता व करेगांव हे ते कारखाने होत. त्यांनीं जी. एच. एच. ह्या जर्मन कंपनीकडे मशिनरीची ऑर्डर दिली, ती येथें येण्यास अनेक कारणांमुळें उशीर झाला. मशिनरीचा कांहीं भाग मद्रास येथें जर्मन कंपनीतर्फे के. सी. पी. कंपनीनें करावयाचा होता, तो वेळेवर पुरा होऊं शकला नाहीं. कारखान्यांची उभारणी करण्याचें काम जर्मन कंपनीकडेच होतें; पण, मशिनरी तयार नसल्यामुळें कारखाने उभारून झाले नाहींत. हात जोडून स्वस्थ बसण्यापेक्षा जर्मनींत परत जाणें त्यांनीं पसंत केलें आहे! जर्मन मशिनरी येऊन पडली असून, मद्रास येथें तयार व्हावयाची मशिनरी लवकरच रेल्वेवर चढेल, असें समजतें. ह्या चार कारखान्यांनीं केलेली सर्व पूर्वतयारी सहाजिकच वाया गेली, नोकरांच्या पगाराचा बोजा त्यांचेवर बसला, नेमलेल्या लोकांवर बेकारीची पाळी आली आणि शेतकऱ्यांचा ऊंस गाळून त्याची साखर न बनल्यामुळें नुकसान झालें. मशिनरींपैकी कांहीं भाग भारतांतच बनवला गेला पाहिजे, ही मध्यवर्ती सरकारची अट नसती, तर परदेशी यंत्रसामुग्री जरा उशीरा कां होईना, बसून गेल्या मोसमांतच साखर करूं लागली असती. नुकसानीस कोण जबाबदार आहे, त्या नुकसानीची रकम किती ठरवावयाची व त्याची भरपाई कोणी करावयाची, हे प्रश्न पुढें उभे रहातील. १ नोव्हेंबर रोजीं हे चारी कारखाने सुरू होतील, अशी आशा आहे.

फलटण येथील सहकारी कारखान्याची उभारणी चालूं असून तो येत्या मोसमांत सुरू होईल. सणसरच्या कारखान्यांत लोणी कारखान्याची जुनी मशिनरी घेऊन बसविलेली आहे, तेव्हां त्याला आयातीचें धोरण भोवण्याचा प्रश्नच नाहीं.

भोगावती, वारणा, पंचगंगा, सांगली, हे कारखाने १९५८–५९ मध्यें सुरू होतील. त्यांची मशिनरींची ऑर्डर पक्की झाली आहे. यंत्रसामुग्रीच्या जर्मन कारखानदारांनीं मालाचे पैसे हप्त्यांनीं घेण्याचें मान्य केलें आहे; हुंडणावळीवरील ताण त्यामुळें कमी होईल पण मशिनरीला सुमारें १६% किंमत ज्यास्त पडेल. वेदगंगा कारखान्याची अद्याप प्रगति दिसत नाहीं. कऱ्हाडच्या कृष्णा सहकारी कारखान्याच्या मशिनरीच्या ऑर्डरीबाबत वाटाघाटी चालू आहेत, असें समजतें.

मुंबई राज्याचे अर्थमंत्रि, डॉ. जिवराज मेहता, ह्यांनीं सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेचे मार्गातील अडचणींचें निवारण करण्याच्या कामीं नेटानें प्रयत्न चालविलेले आहेत आणि त्यांच्या हातीं हा प्रश्न आहे, ही भाग्याची गोष्ट आहे, असेंच सहकारी गोटांतील मत आहे.

**युगोस्लाव्हिआंत रशिअन भांडवल**—युगोस्लाव्हिआंत रशिअन सरकारनें भांडवल गुंतवावें म्हणून खटपट करण्यासाठी युगोस्लाव्हिआचें एक प्रतिनिधीमंडळ रशिआंत जाणार आहे. युगोस्लाव्हिआच्या अल्युमिनमच्या धंद्यांत १७ कोटी, ५० लाख डॉलर्स भांडवल गुंतविण्यांत यावें, अशी युगोस्लाव्हिआच्या सरकारची इच्छा आहे.

**आयुर्वेदीय दवाखान्यांना उत्तेजन**—आयुर्वेदीय औषधपद्धतीला उत्तेजन देण्यासाठीं मध्यप्रदेश सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अधिक आयुर्वेदीय दवाखाने ग्रामीण भागांत उघडण्याचें ठरविलें आहे. सध्यां मध्यप्रदेशांत असे ७०० दवाखाने आहेत. दर पांच चौरस मैलांत एक दवाखाना खोलण्याचा सरकारचा विचार आहे.

**गुरांची कृत्रिम रीत्या पैदास**—मद्रास राज्यांत गुरांची कृत्रिम रीत्या पैदास वाढविण्याचीं ४१ केंद्रें सध्यां आहेत. चालू वर्षी आणखी कांहीं केंद्रें खोलण्याचा सरकारचा विचार आहे. १९५६–५७ सालांत सरकारनें ५८ खेड्यांतून अशीं केंद्रें स्थापन केलीं. ह्या कामासाठी सरकारला २.६० लाख रुपये खर्च करावे लागले.

**अणुशक्तीच्या माहितीची देवघेव**—लष्करी क्षेत्रांत अणुशक्तीचा उपयोग होण्यासारखी माहिती एकमेकांना देण्याघेण्याचा करार अमेरिकेनें ऑस्ट्रेलिआशीं केला आहे. अशाच प्रकारचा करार अमेरिकेनें ब्रिटन व कॅनडा ह्या देशांबरोबरहि केला आहे. अमेरिकेच्या संरक्षण योजनांत ऑस्ट्रेलिआला महत्त्वाचें स्थान आहे, असा ह्याचा अर्थ करण्यांत येत आहे.


दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

★ वाढत्या व्याजाचा लाभ घ्या ★

स्पेशल सेव्हिंग्ज द. द. २॥ टक्के

सेव्हिंग्ज बँक द. द. २ टक्के

चालू ठेव द. द. ॥ टक्का

★ मुदत ठेवी ★

१ ते २ वर्षे : द. द. ३ टक्के

३ वर्षे : द. द. ३। टक्के

५ वर्षे : द. द. ३॥ टक्के

५ वर्षांवर मोठ्या रकमांना विशेष दर

३ ते ९ महिने मुदतीसाठी वहा हजारांवर रकमांना आकर्षक व्याज

विशेष माहिती मुख्य कचेरी वा शाखा एजंटांकडे मिळेल.

मुख्य कचेरी
पुणें २

मॅनेजर

## धरणयोजनांच्या कामांत सिमेंटची व पोलादाची काटकसर

### मध्यवर्ती सरकारचा राज्यांना आदेश

धरणयोजनांच्या बांधकामासाठी लागणाऱ्या सिमेंट व पोलादाचा अत्यावश्यक कामासाठीच वापर केला जातो याकडे दक्षतापूर्वक पाहण्यांत यावें अशी सूचना मध्यवर्ती वीज व पाटबंधारे खात्यानें राज्य सरकारांना केली आहे. या वस्तूंची जास्तींत जास्त बचत व्हावी असा त्यामागें हेतु आहे. याचबरोबर धरणयोजनांचे काममध्यें अनावश्यक खर्च व नासधूस टाळावी अशीहि आणखी सूचना या खात्यानें केलेली आहे. त्यासाठी अशा योजनांच्या, विशेषतः मोठ्या योजनांच्या कामावरील नोकरवर्गाच्या संख्येचा वेळोवेळीं आढावा घेण्यांत यावा, नोकरवर्गाची संख्या कामाच्या प्रमाणांत असावी असा त्यामागील दृष्टिकोन आहे.

त्याचप्रमाणें पायाभरणी व उद्घाटनाचे समारंभ इत्यादींवरील खर्चहि कमी करण्यांत यावा असेंहि सुचविण्यांत आलें आहे. यामुळें खर्चाचें प्रमाण वाजवी मर्यादेंत राहील. शिवाय ह्या समारंभांसाठी कराव्या लागणाऱ्या व्यवस्थेपायीं जाणारा अधिकारीवर्गाचा वेळहि बराच वांचेल.

या खात्यानें 'एकॉनॉमी इन् दि युज ऑफ स्टील' व 'युज ऑफ लाइम-मॉर्टर ॲण्ड लाइम पोझोलोन मॉर्टर इन् प्लेस ऑफ सिमेंट' यावरील अहवालांच्या प्रतीहि राज्य सरकारांकडे पाठविलेल्या आहेत. हिराकूड येथें जानेवारी, १९५७ मध्यें या खात्यानें भरविलेल्या चर्चासंमेलनाचे वेळीं दोन उप-समित्यांनीं हे अहवाल तयार केलेले आहेत. सिमेंट आणि पोलाद यांच्या बचतीसाठी सदर अहवालांत जे उपाय सुचविलेले आहेत त्यांचा अवलंब करावा अशी विनंती राज्य सरकारांना करण्यांत आलेली आहे.

आणखी असेंहि सुचविण्यांत आलें आहे कीं, एक मजली व दोन मजली इमारतींच्या छपरासाठी कॉंक्रीटचा व दरवाज्यांवरील चौकटीकरितां पोलादाचा वापर करूं नये. लांकूड, कौलें व अल्युमिनियम यांचा अधिक प्रमाणांत वापर केला जावा. कालव्यांवरील कामांत पुलांच्या बांधकामांत २० फुटांपर्यंतच्या कमानींसाठी कॉंक्रीटच्या लाद्या न वापरतां दगडाच्या कमानी ठेवाव्यात.

### बांधकामांत सिमेंटची बचत

इमारतींच्या भिंती उभारतांना शक्य तेथें सिमेंट ऐवजीं चुन्यांचा उपयोग करण्यांत यावा. जमिनी, छप्परें, दरवाज्यावरील चौकटी यांसारख्या अत्यावश्यक बाबींसाठीच सिमेंटचा वापर करावा.

त्याचप्रमाणें ग्रॅव्हिटी डॅम अगर १०० फुटांहून कमी उंचीचे धरणाचे भाग बांधतांनाहि सिमेंट ऐवजीं हायड्रॉलिक लाइम व तत्सम साहित्याचा वापर करावा. १०० फुटांहून अधिक उंचीचीं धरणें बांधतांनासुद्धां सिमेंट वापरतांना त्याची आवश्यक त्या ठिकाणींच निवड करावी व वापरावर सक्त नियंत्रण असावें.

जोडरस्ते, फुटपाथ, इत्यादि बांधतांनाहि कॉंक्रीट ऐवजीं इतर साहित्यांचा वापर करावा आणि कॉंक्रीटचाच रस्ता बांधण्याची कल्पना लांबणीवर टाकावी.

कालव्यांच्या बांधकामांतहि शक्य तेथें चुनखडीचाच उपयोग करण्यांत यावा.

काटकसरीच्या वरील उपाययोजना सर्व योजना अधिकाऱ्यांस कळविण्याची सूचना राज्य सरकारांस देण्यांत आली आहे.

तारा, ट्रंक टेलिफोन कॉल्स, स्टेशनरी यांचा वापर करण्याचे बाबतींत व दौऱ्यांत कशा प्रकारें काटकसरीचे उपाय योजावेत त्याचे नियम निरनिराळ्या खात्यांना कळविण्यांत आले आहेत. सेक्शन ऑफिसर्स व्यतिरिक्त, एखादा नोकर रजेवर गेल्यामुळें झालेली जागा भरूं नये; सेक्शन ऑफिसरच्या जागीं एखाद्याची नेमणूक झाल्यानें रिकामी झालेली जागा भरूं नये. निवड झालेले उमेदवार सोडून नवीन इतर रिकाम्या जागा भरूं नयेत, मंजुरी मिळालेली नवीन योजना सोडून नवीन जागा निर्माण करण्याचें टाळावें अशीहि सूचना या खात्यानें दिली आहे.

---

### परदेशांत नोकरी करणारे भारतीय

परदेशांत नोकरी करणाऱ्या भारतीयांना तशाच प्रकारच्या नोकऱ्या भारतांत देण्याची कितपत शक्यता आहे हें अजमाविण्यासाठी त्यांच्या संबंधीची माहिती गोळा करण्यांत येणार आहे.

विशेषतः शास्त्रीय आणि तांत्रिक नोकरवर्गाकडून तपशीलवार माहिती मिळविण्यासाठी भारताच्या परदेशांतील मंडळाकडे एक तक्ता पाठविण्यांत येत आहे. अशा तऱ्हेनें गोळा केलेल्या ह्या माहितीवरून निरनिराळ्या सरकारी खात्यांना आणि इतर मालकवर्गाला ह्या लोकांचा आपल्याला किती प्रमाणांत उपयोग करून घेतां येईल तें ठरवितां येईल.

मध्यवर्ती गृहखात्यांतील मनुष्यबळ विभागानें गेल्या वर्षी देशांतील मनुष्यबळाचा अंदाज घेण्याचें व देशाच्या तांत्रिक गरजा पुऱ्या करण्याचें कार्य अंगिकारिलें होतें. ह्या वर्षीहि देशांतील मनुष्यबळाचा अभ्यास करण्यासाठी या खात्यानें एक व्यापक कार्यक्रम आंखला आहे. विविध प्रकारच्या मनुष्यबळाची असलेली गरज आणि उपलब्धता, उदाहरणार्थ स्थापत्यशास्त्रविषयक, शास्त्रीय, कारभाराविषयक, शेतकीविषयक, आरोग्यविषयक, शैक्षणिक, औद्योगिक व्यवस्था ठेवणारा नोकरवर्ग, तसेंच कुशल आणि बिन-वाकबगार कारागीर अशा सारख्या मनुष्यबळाचा अभ्यास करण्याचा अंतर्भाव ह्या योजनेंत आहे.

मनुष्यबळाच्या प्रश्नाच्या दीर्घ मुदतीच्या नियोजनासाठी, नियोजनमंडळामध्यें एक संघटना उभारण्यांत आली आहे. ह्या संघटनेनें यापूर्वीच अभ्यास करण्यास सुरुवात केली असून, त्यामुळें मनुष्यबळाचें दीर्घ मुदतीचें नियोजन करण्यासाठी महत्त्वाची माहिती मिळेल.

---

### शेतकऱ्यांसाठी होणाऱ्या नभोवाणीच्या कार्यक्रमाच्या वेळेंत बदल

पुणें नभोवाणी केंद्रावरून शेतकऱ्यांसाठी होणारा कार्यक्रम दररोज सायंकाळीं ६-२० ते ७-२० असा होतो. पण ही वेळ शेतकऱ्यांना योग्य नसल्याचें कांहीं शेतकऱ्यांनीं कळविलें आहे. तसेंच नभोवाणी शेतकरी मंडळ यांचेंहि मत आहे. तरी दिनांक १६-८-१९५७ पासून शेतकऱ्यांसाठी होणारा पुणें नभोवाणीवरील कार्यक्रम दररोज सायंकाळीं ७ ते ८ याप्रमाणें ध्वनिक्षेपित केला जाईल.

त्याचप्रमाणें प्रत्येक मंगळवारीं व शुक्रवारीं होणारा नभोवाणी शेतकरी मंडळाचा कार्यक्रमहि सायंकाळीं ७-३० ते ८ असा अर्धा तास होईल.

## कर्ज उभारणीचें नवें धोरण

राज्य सरकारांनीं आपल्या स्वतःसाठी स्वतंत्र कर्जउभारणी करूं नये, असें आतां ठरलें आहे. अल्प बचतयोजनांच्या द्वारां त्यांनीं पैसा मिळवावा, अशी अपेक्षा आहे. मध्यवर्ती सरकारनेंच मोठीं कर्जें उभारून त्यांतील रकमा राज्य सरकारांना पुनः कर्जाऊ याव्यात, अशी योजना आहे. गेल्या दोन वर्षांतील मध्यवर्ती व राज्य सरकारांच्या कर्ज उभारणीचे आंकडे असे आहेत:—

| | मध्यवर्ती सरकार | राज्य सरकारें |
|---|---|---|
| १९५५-५६ | ३३.३० कोटी रु. | ४८.७३ कोटी रु. |
| १९५६-५७ | ७७.७३ ,, | ६२.७५ ,, |

राज्य सरकारांनीं अल्प बचत योजनांवर अवलंबून रहावयाचें म्हटलें, तर त्यांच्या मर्यादा खालील आकड्यांवरून स्पष्ट होतील. अल्प बचतींच्या द्वारां अधिकाधिक रकम जमा होत असली, तरी ती खासच अपुरी पडेल.

**अल्प बचतीच्याद्वारा मिळालेली रकम**

| | (कोटी रु.) |
|---|---|
| १९५१-५२ | ३८.४७ |
| १९५२-५३ | ४०.१५ |
| १९५३-५४ | ३७.८१ |
| १९५४-५५ | ५४.६१ |
| १९५५-५६ | ६६.१० |
| १९५६-५७ | ६४.६० |

---

### उसाच्या उत्पादनांत १२.८ टक्क्यांनी वाढ

भारतांत १९५६-५७ मध्यें ५०,१९,००० एकर विभागांत उंसाची लागवड झाली असून त्यापासून ६,६८,९०,००० टन उत्पादन येईल, असा मध्यवर्ती अन्न आणि शेतकी खात्याच्या अर्थ आणि आंकडेवारी विभागाचा ह्या पिकाबाबतचा अखेरचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या किंचित् दुरुस्त केलेल्या अंदाजांतील लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यांचे हेच आंकडे अनुक्रमें ४५,६४,००० एकर आणि ५,९३,१७,००० टन असे होते. यावरून गेल्या वर्षीपेक्षा यंदा लागवडीखालील क्षेत्रांत ४,५५,००० एकरांनीं किंवा १०.० टक्क्यांनीं आणि उत्पादनांत ७५,७३,००० टनांनीं किंवा १२.८ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येईल.

चालू वर्षी गुळाचें उत्पादन ६७,४५,००० टन झालें. १९५५-५६ मधील हाच आंकडा ५९,८२,००० टन होता.

हें पीक काढणाऱ्या सर्व राज्यांत आणि विशेषतः उत्तर प्रदेश, पंजाब, मुंबई आणि बिहार या राज्यांत लागवडीच्या क्षेत्रांत वाढ झाली असून ह्या पिकाच्या लागवडीचे वेळीं गेल्या वर्षीपेक्षा अनुकूल असलेलें हवामान त्यास कारणीभूत आहे.

---

### टाटा कंपनीचें डिव्हिडंड

३१ मार्च, १९५७ अखेर संपलेल्या वर्षासाठी टाटा कंपनीच्या डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें डिव्हिडंड सुचविलें आहे:—

(१) फर्स्ट प्रेफरन्स शेअर्सवर प्रत्येक भागास रु. ९.०० (इनकमटॅक्स कापून घेणेचा)

(२) सेकंड प्रेफरन्स शेअर्सवर प्रत्येक भागास रु. ७.५० (इनकमटॅक्स कापून घेणेचा)

(३) नव्या ऑर्डिनरी शेअर्सवर प्रत्येक भागास रु. १.७४ अधिक रु. ०.८० भांडवलांतून व्याज.

**आणखी एक अशोकस्तंभ**—नेपाळमधील लुंबिनी हें गांव गौतमबुद्धाचें जन्मस्थान आहे. ह्या गांवापासून ७ मैलांवर एक नवीन अशोकस्तंभ आढळून आला आहे, तो २,००० वर्षांपूर्वीचा असावा. त्याची उंची १८ फूट आहे. आशिआंत सांपडलेला हा १४ वा अशोकस्तंभ आहे. लुंबिनीच्या आसपासचा हा तिसरा स्तंभ आहे.

**जागतिक बँकेला जर्मनीचें कर्ज**—पश्चिम जर्मनीच्या सरकारनें जागतिक बँकेला ३.६ कोटी पौंड कर्ज दिलें आहे. गरीब देशांना मदत करण्यासाठीं ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे. पौंडी चलनावर असलेला विश्वास व्यक्त करण्यासाठी म्हणून बँक ऑफ इंग्लंडमध्यें ७.५ कोटी पौंड ठेव म्हणून ठेवण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे.

**तागाच्या मालाची निर्यात**—भारताच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापारांत सुसूत्रता आणण्यासाठी सरकारनें नेमलेल्या बोर्डाची पहिली बैठक नुकतीच झाली. पूर्व युरोपांतील देशांना तागाच्या मालाची व आशिआंतील देशांना वनस्पती तूप निर्यात करण्याच्या प्रश्नाचा बैठकींत विचार करण्यांत आला.

**रुपयाच्या अवमूल्यनाची सूचना**—परदेशीय हुंडणावळीच्या तुटवड्याची अडचण निवारण्याचा एक मार्ग म्हणून भारताच्या रुपयाचें अवमूल्यन करण्यांत यावें अशी सूचना सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. बी. आर. शेणॉय ह्यांनीं केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भांडवलाची फाजील गुंतवणूक करण्यामुळें हुंडणावळीची अडचण उद्भवली आहे, असें ते म्हणतात.

**एस्टेट ड्यूटीपासून उत्पन्न**—भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं, १९५६-५७ सालांत निरनिराळ्या राज्यांतून एस्टेट ड्यूटीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा एक तक्ता लोकसभेला सादर केला. त्यामधील माहितिप्रमाणें सर्व राज्यांत मिळून २,१०,७५,१३५ रुपयांचें उत्पन्न सरकारला मिळालें. सर्वांत अधिक उत्पन्न मुंबई राज्याकडून मिळालें. मुंबई राज्यांत १,०७,९०,६५३ रुपये कराच्या रूपानें गोळा झाले.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचा धंदा**—१ सप्टेंबर, १९५६ पासून २४ जून, १९५७ पर्यंतच्या कालांत सरकारच्या आयुर्विमा कॉर्पोरेशननें ११७.२४ कोटी रुपये किंमतीचीं नवीन विमापत्रकें दिलीं अशी माहिती लोकसभेंत सादर करण्यांत आली.

**राष्ट्रीय नाट्यगृहाची इमारत रद्द?**—भारत सरकारच्या शिक्षण खात्यानें दिल्ली येथें एक भव्य राष्ट्रीय नाट्यगृह बांधण्याचें ठरविलें होतें. संकल्पित नाट्यगृहाचा नकाशा तयार करण्याचें काम चालू आहे. तथापि, काटकसरीची गरज आणि सिमेंट व पोलादाचा तुटवडा लक्षांत घेतां इमारत बांधली जाईल किंवा नाहीं ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येत आहे. इमारतीच्या खर्चाचा अंदाज १ कोटीचा आहे.

**रशिआचें नवें विमान**—रशिअन राज्यक्रांतीच्या ४० व्या वर्षदिनाच्या समारंभप्रसंगीं राशिआनें एक नवीन विमान तयार करण्याचें ठरविलें आहे. विमानांत १८० प्रवासी बसूं शकतील, त्याचा वेग दर तासाला ५६० मैल असेल आणि ते ४,००० मैलांचा अखंड प्रवास करूं शकेल.

**पिकांच्या विम्याची योजना**—नैसर्गिक आपत्तीपासून अन्नधान्याच्या पिकांना संरक्षण देण्यासाठी विम्याची योजना तयार करण्याचें सिलोनच्या सरकारनें ठरविलें आहे. पिकांच्या विम्यासाठी शेतकऱ्याला भराव्या लागणाऱ्या हप्त्यांपैकी बराच भाग सरकार सोसणार आहे, असें समजतें.

## भारताला जागतिक बँकेकडून ९ कोटी डॉलर्स कर्ज

### अमेरिकन, जपानी, ब्रिटिश व इटालिअन चलनांत मिळणार

जागतिक बँकेनें भारत सरकारला ९ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे, व त्याबाबतच्या करारावर बँकेचे अध्यक्ष मि. ब्लॅक व भारताचे अमेरिकेंतील प्रतिनिधि श्री. मेहता ह्यांनीं सह्याहि केल्या आहेत. हिंदी रेल्वेजच्या विस्तारासाठी भारतानें परदेशांतून मागविलेल्या सामुग्रीच्या किंमतींपैकी निम्मी रक्कम ह्या कर्जातून भागवितां येईल. कर्जावर व्याजाचा दर ५⅝% आहे; त्यांतच बँकेचें १% कमिशन समाविष्ट आहे. कर्ज खालील चलनांत मिळणार आहे :—

| | | |
|---|---|---|
| अमेरिकन ( डॉलर ) | ३·५७ | कोटी डॉलर्स |
| जपानी ( येन ) | २·४० | ,, ,, |
| ब्रिटिश ( पौंड ) | १·९१ | ,, ,, |
| इटालियन ( लिरा ) | १·१२ | ,, ,, |
| एकूण | ९·०० | ,, ,, |

### नृत्यकलाकाराचा चीनमधील दौरा

सुप्रसिद्ध भारतीय नृत्यपटु श्री. उदयशंकर आपले २७ सहकारी बरोबर घेऊन चीनला गेले आहेत. चीन सरकारच्या विनंतीवरून त्यांचें कलापथक चीनचा ६ आठवड्यांचा दौरा करणार आहे. चीनला जाण्याचा श्री. उदयशंकर ह्यांचा हा पहिलाच प्रसंग आहे. आपल्या चीनमधील मुक्कामांत ते दोन नाट्यकृति चिनी प्रेक्षकांना सादर करणार आहेत. त्यांपैकी एक नाटक बुद्धाच्या जीवनावर आधारलेलें असून तें सावल्यांच्या आकृतींनीं दाखविण्यांत येणार आहे. त्याशिवाय रामायणावर आधारलेलें 'रामलीला' म्हणून एक नाटकहि करण्यांत येणार आहे. कलापथकाला लागणारें विविध प्रकारचें साहित्य तीन टन वजन भरेल इतकें असून तें सर्व विमानानें आधींच चीनला रवाना करण्यांत आलें आहे. ह्या कलासाहित्यांत भारतीय पद्धतीचीं वाद्येंच ११५ आहेत. सुमारें २५ वर्षांपूर्वी चीनमधील दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासाठी श्री. उदयशंकर ह्यांनीं लंडन येथें आपला एक कार्यक्रम करून दाखविला होता. तेव्हांपासूनच चीनमध्यें जाण्याची त्यांची इच्छा होती. चीनहून परत आल्यावर श्री. उदयशंकर लवकरच अमेरिकेंत जाण्याच्या विचारांत आहेत. एका बड्या तेलकारखानदारानें त्यांना अमेरिकेला बोलाविलें आहे. त्यांच्या ह्या दौऱ्याचा खर्च रॉकफेलर फौंडेशन व 'लाइफ' हें नियतकालिक, ह्यांच्यातर्फे करण्यांत येणार आहे. हा दौरा पैसा मिळविण्याच्या स्वरूपाचा नाहीं. 'हॉलिवुड बाउल' ह्या प्रचंड नाट्यगृहांत बहुधा त्यांचे कार्यक्रम करण्यांत येतील. हें नाट्यगृह इतकें मोठें आहे कीं त्यांत ८०,००० प्रेक्षक बसूं शकतात.

### सहकारी नेते श्री. माधवराव देशपांडे ह्यांचा मृत्यु

मध्यप्रदेशांतील सहकारी चळवळीचे पुरस्कर्ते, श्री. माधवराव देशपांडे हे वयाच्या ८३ व्या वर्षी नागपूर येथें कॅन्सरच्या विकारानें मृत्यु पावले. विदर्भांतील सहकारी बँकिंगमध्यें त्यांनीं पुढाकार घेतला होता.

### दिवाळीची सुट्टी

दिवाळीची सुट्टी २२ व २३ ऑक्टोबर रोजीं मुंबई सरकारनें जाहीर केली होती. परंतु, हे दिवस बरोबर नाहींत, असें सरकारच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, सरकारनें सुट्टीचे दिवस बदलून ते २३ व २४ ऑक्टोबर, असे केले आहेत.

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व इलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,११,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लठ्ठे रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,७१,५०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,६१,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. के. ए. चौगुले, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन
श्री. एम. बी. चौगुले, शाहूपुरी–कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

## श्री. गरवारे यांचें परदेशीं प्रयाण

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. भालचंद्र दिगंबर ऊर्फ आबासाहेब गरवारे हे रविवारीं (दि. ७-७-५७) रात्रीं विमानानें लंडनला गेले. ऑल इंडिया प्लॅस्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे ते अध्यक्ष असून लंडन येथें १० जुलै पासून ब्रिटिश प्लॅस्टिक्स फेडरेशन भरवीत असलेल्या ब्रिटिश प्लॅस्टिक प्रदर्शनाचे उद्‌घाटनास ते उपस्थित रहाणार आहेत.

श्री. गरवारे यांची डोमिनिअन प्लॅस्टिक इंडस्ट्रिज नांवाची प्लॅस्टिकची मोठी फॅक्टरी आहे. लंडन येथील प्रदर्शनाला अमेरिका, इंग्लंड व युरोपमधील कारखानदार येणार असून प्रदर्शनांत धंद्याची अद्यावत् प्रगति आणि कच्च्या मालाची व यांत्रिक संशोधनांची माहिती मिळविण्याचा श्री. गरवारे यांचा मानस आहे.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री या भारतीय व्यापारी व कारखानदारांच्या संस्थेनें योजिलेल्या भारतीय उद्योगपतींच्या शिष्टमंडळांत श्री. गरवारे हेहि एक प्रतिनिधि असून इंग्लंड, अमेरिका, कॅनडा व युरोप या ठिकाणीं हें शिष्टमंडळ साधारणतः तीन महिने दौरा करणार आहे. या शिष्टमंडळाचें नेतृत्व सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला यांचेकडे आहे.

श्री. गरवारे यांचे गरवारे फिनॅन्स कॉर्पोरेशन, गरवारे प्लॅस्टिक्स, डोमिनिअन प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, गरवारे मोटर्स इ. व्यवसाय असून याशिवाय अनेक औद्योगिक व्यवसायांशीं त्यांचा संबंध आहे. भारतांतील व्यापारी क्षेत्रांतील प्रमुख व्यक्तींत त्यांची गणना होते. गेल्या वर्षी टोकियो येथें भरलेल्या 'एकाफे' परिषदेला फेडरेशनचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित होते.

देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासासंबंधीं त्यांना आस्था असून महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा यांच्या विकासासाठी स्थापन झालेल्या महाराष्ट्र आर्थिक विकास समितीचे ते कार्याध्यक्ष आहेत.

## महाराष्ट्र प्रांतीय वैद्य-संमेलन, मिरज

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनाचें १२ वें अधिवेशन मिरज येथें दि. १ व २ नोव्हेंबर १९५७ रोजीं भरविण्याचें निश्चित ठरलें आहे. या संमेलनांत आयुर्वेद, ॲलोपाथी व युनानी यांच्या समन्वयाबाबत चर्चा, आयुर्वेदावरील आक्षेप व त्यावरील चर्चा, आयुर्वेदीय निर्माण पद्धतींत शास्त्रबद्धता आधुनिक विज्ञानद्वारें कशी आणतां येईल यांचीं प्रात्यक्षिकें, वगैरे अनेक गोष्टी होणार आहेत.

या संमेलनांत अनेक प्रथितयश वैद्यराज उपस्थित राहणार आहेत. रुग्ण परीक्षेकरतां नांवें नोंदवितां येतील. अधिक माहितीकरतां वैद्य म. द. करमरकर, चिटणीस महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलन, मिरज यांचेकडे चौकशी करावी.

## श्री. डी. आर. थॉम ह्यांचे मृत्यूविषयीं शोकप्रस्ताव

इंडियन बँक्स असोसिएशनच्या सभेनें गेल्या गुरुवारीं, दि. १८ रोजीं, श्री. डी. आर. थॉम, बँक ऑफ इंडिया लि. चे जनरल मॅनेजर, ह्यांच्या अकाली दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करणारा ठराव केला. गेल्या कांहीं वर्षांतील बँक ऑफ इंडियाच्या प्रगतीचें बरेंच श्रेय त्यांना आहे, असें ठरावांत म्हटलें आहे. एप्रिल, १९५५ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत ते असोसिएशनचे डेप्युटी चेअरमन होते.

## महाराष्ट्र रीजनल कोऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १.

१०. बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें-१

### कोऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा, एप्रिल १९५७.

खालील विद्यार्थी परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत:—

**पहिला वर्ग:**—व्ही. ए. चौधरी, इ. एस. कोलते, एच. बी. माने, पी. बी. पाटील.

**दुसरा वर्ग:**—एस. एम. बावीसकर, आर. ए. देशपांडे, आर. डी. देशपांडे, एन. ए. देसूरकर, के. जी. दिवटे, बी. एम. गोडबोले, व्ही. वाय. गोरे, जी. जी. जाधव, एस. एम. खैरनार, बी. ए. खोत, के. बी. कुलकर्णी, के. आर. कुलकर्णी, टी. डी. नवले, जी. एन. पंढीत, बी. जी. पवार, डी. एन. पोतदार, पी. एच. पुरोहीत, एच. आर. रायरीकर, एम. टी. शिंदे, बी. बी. शिरढोणे, एम. जी. सिनकर, एस. जी. तुळपुळे, पी. एस. वाणी.

**तिसरा वर्ग**—एन. जी. बढवे, पी. टी. वाउमकर, बी. एम. दंतकाळे, ए. डी. देशमुख, पी. व्ही. देशपांडे, जे. आर. होळकर, जी. डी. जातेगांवकर, आर. जी. कदम, एम. एन. खोत, ए. आर. कुलकर्णी, बी. व्ही. कुलकर्णी, ए. डी. मोघे, जी. आर. मोरे, आर. डी. निकम, बी. जी. निन्हाळी, जे. के. पंढीत, सी. एम. पाटील, डी. पी. पाटील, एच. आर. पाटील, एम. ए. पवार, व्ही. एम. रिसवूड, एम. जी. साळुंखे, डी. एम. साळवेकर, वाय. आर. लाव्हे, आर. ए. शेख, एन. टी. शेळके, ए. बी. शिंदे, एस. एम. सोनार, एम. व्ही. सुळाखे, के. जी. आपटे, कु. सुधा अष्टपुत्रे, कु. निशा पेठकर, कु. मालती प्रधान, सी. एन. शेटे, बी. एन. उपासनी, व्ही. के. वाणी.

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचें काम

१ जानेवारी, १९५७ ते ३० जून, १९५७ ह्या सहामाहींत कॉर्पोरेशननें ७५ कोटी रुपयांचें आयुर्विम्याचें काम पुरें केलें. ह्याच मुदतींत ११४ कोटी रु. चे विमाअर्ज आलेले आहेत. १९५६ च्या पहिल्या सहामाहींत १२८ कोटी रु. चे विमाअर्ज येऊन ९५ कोटी रु. चें काम पुरें झालें होतें.

आयुर्विम्याचें काम खाजगी कंपन्यांकडे असतांना, त्यांना १९५५ हें वर्ष फार चांगलें गेलें होतें. ह्या दृष्टीनें खालील तुलना उद्‌बोधक होतील:—

| जाने.-जून | विमा अर्ज (कोटी रु.) | पुरें झालेलें काम (कोटी रु.) |
|---|---|---|
| १९५५ | उपलब्ध नाहीं | ७८ |
| १९५६ | १२८ | ९५ |
| १९५७ | ११४ | ७५ |

१९५७ मध्यें कामांत एकसारखी वाढ होत आहे. पहिल्या तिमाहींत ४६ कोटी रु. चे अर्ज येऊन २२ कोटींचें काम पुरें झालें, तर त्या पुढील तीन महिन्यांत अशी प्रगति झाली:—

| | | |
|---|---|---|
| एप्रिल | ३१ | १४ |
| मे | २४ | १७ |
| जून | २८ | २२ |

**केरळ राज्यांत नवे उद्योगधंदे**—केरळ राज्यांत नवीन उद्योगधंदे स्थापन करण्याची शक्यता अजमावण्यासाठी एका मोठ्या जपानी कंपनीच्या दिल्ली येथील प्रतिनिधींनें राज्य सरकारचे उद्योगमंत्री श्री. के. पी. गोपालन् ह्यांची भेट घेतली केरळ सरकारनें राज्यांत उद्योगधंदे काढण्यासाठी भारतामधलि उद्योगपतींनाहि पाचारण केलें आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.